# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १४२** **दिनांक ०३/०६/२०२१**

## <u>अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाने एका आरोपीस ताब्यात घेवून अल्पवयीन मुलीची केली सुटका.</u>

दि.२८.०४.२०२१ रोजी फिर्यादी यांनी त्यांच्या अल्पवयीन मुलीस कोणीतरी अज्ञात इसमाने, अज्ञात कारणावरुन फुस लावून पळवून नेले बाबत दिलेल्या तक्रारीवरुन भाईंदर पोलीस ठाणे गुन्हा क्र. १९३/२०२१ भादविसं.क. ३६३ प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना, अपहृत मुलीच्या आई-वडीलांना समक्ष बोलावून तसेच गुन्हा घडलेल्या परिसरात भेट देवून माहिती घेतली असता, संशईत इसम नामे विजय उर्फ मयाराम रामशंकर राजभर, वय-२३ वर्ष सध्या रा. गणेश देवल झोपडपटटी, भाईंदर पश्चिम. मुळ रा. गाव-जितुआपूर, पोलीस ठाणे कलारी, जिल्हा बस्ती राज्य उत्तरप्रदेश हा घटना घडलेल्या तारखे पासून भाईंदर पश्चिम येथुन संशयीत रित्या निघून गेला असल्याबाबतची माहिती मिळाली. तसेच अपहृत मुलगी व संशयीत यांचे संभाव्य वास्तव्याबाबत माहिती मिळवुन तांत्रिक गोर्ष्टींचा आधार घेतला असता यातील संशयीत हा अल्पवयीन मुलीस घेवून जिल्हा-बस्ती राज्य-उत्तरप्रदेश येथे गेला असल्याची खात्रीशिर माहिती मिळाल्याने गुन्हयाचे तपासकामी पोलीस पथक जिल्हा-बस्ती राज्य- उत्तरप्रदेश येथे रवाना झाले होते.

पोलीस पथकाने सदर अल्पवयीन मुलीस जिल्हा- बस्ती राज्य उत्तरप्रदेश येथुन ताब्यात घेवुन येत असतांना संशयीत विजय उर्फ मायाराम रामशंकर राजभर हा रेल्वे गाडी क्र. ०२१०४ मधुन मुंबईला येत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने लोकमान्य टिळक टर्मिनल, कुर्ला, मुंबई येथील परिसरात सापळा लावुन ताब्यात घेतले आहे.

. सदरची कारवाई डॉ.श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संपतराव पाटील, पो.नि. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर, पो.हवा./२२६९ उमेश पाटील, पो.हवा./१९८७ विजय ढेमरे नेम. अ.मा.वा.प्रति.कक्ष, भाईंदर व मपोशि. पऱ्हाड नेम-भाईंदर पोलीस ठाणे यांनी केली आहे.

-------ooooo-------